## MAHARASHTRA ACT No. XX OF 1960.

## AN ACT TO EXTEND THE COMMERCIAL DOCUMENTS EVIDENCE ACT, 1939, THROUGHOUT THE STATE OF MAHARASHTRA.

## सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०.

[राष्ट्रपति यांची संमति मिळाल्यानंतर "महाराष्ट्र सरकारच्या राजपत्रांत" दिनांक २४ ऑक्टोबर १९६० रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला.]

### व्यापारी दस्तऐवज पुरावा अधिनियम, १९३९ हा, सबंध महाराष्ट्र राज्यास लागू करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, व्यापारी दस्तऐवज पुरावा अधिनियम, १९३९ हा, सबंध महाराष्ट्र राज्यास लागू करणें इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या अकराव्या वर्षी याद्वारें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :—

लघु संज्ञा.

१. या अधिनियमास व्यापारी दस्तऐवज पुरावा (महाराष्ट्रास लागू करणें) अधिनियम, १९६० असें म्हणावें.

सन १९३९चा अधिनियम क्रमांक ३० हा सबंध महाराष्ट्र राज्यास लागू करणें.

२. या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी महाराष्ट्र राज्याच्या मुंबई व विदर्भ विभागांत अंमलांत असलेला, व्यापारी दस्तऐवज पुरावा अधिनियम, १९३९ हा, याद्वारें महाराष्ट्र राज्याच्या उरलेल्या भागांस लागू करण्यांत येत आहे आणि अशा रीतीनें लागू केल्यामुळें तो त्या भागांत अंमलांत असेल.

सन १९३९चा अधिनियम क्रमांक ३० यांच्या कलम १ची सुधारणा.

३. व्यापारी दस्तऐवज पुरावा अधिनियम, १९३९ याचें कलम १, पोट-कलम (२) यांत, "तो" या शब्दानंतर "महाराष्ट्र राज्याच्या हैदराबाद प्रदेशाव्यतिरिक्त" हा मजकूर दाखल करावा.

(True translation)

P. S. THORAT,

Examiner of Books and Publications, Bombay.